डॉ.पंजाबराव देशमुख अर्बन को-ऑप बँक लि.,

मुख्य कार्यालय, इर्विन चौक, अमरावती
E-mail : pucbho@rediffmail.com दुरध्वनी क्र. (0721) 2663701, 2660872

स्थावर मालमत्तेची निविदेव्दारे विक्रीची नोटीस (दुसरी वेळ)

दी सिक्युरीटायझेशन अँण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनांशियल अॅसेटस् अँण्ड एन्फोर्समेन्ट ऑफ सिक्युरीटी इन्ट्रेस्ट अॅक्ट 2002 चे कलम 13(12) व सिक्युरीटी इन्टरेस्ट (एन्फोर्समेन्ट) रुल्स 2002 अंतर्गत

ज्याअर्थी, कर्जदार, श्री. विनोदकुमार कन्हैय्यालाल राठी ह्यांनी डॉ. पंजाबराव देशमुख अर्बन को-ऑप बँक लि., मुख्य कार्यालय, इर्विन चौक, अमरावती, शाखा : वि. म. वि. रोड, ह्यांचेकडून मुदती कर्ज (Term Loan) रु. 37,80,000/- (अक्षरी रु. सदुतीस लक्ष ऐंशी हजार फक्त) घेतलेले आहे आणि त्या कर्जाच्या परतफेडीकरीता हमी म्हणून श्री. चैतन्य विनोदकुमार राठी यांचे नावे असलेली खालील वर्णनाची स्थावर मालमत्ता बँकेकडे गहाण म्हणून दिलेली असून बँकेने नोटीस पाठवूनही थकीत रकमेचा भरणा कर्जदाराने मुदतीचा आत केला नाही म्हणून खालील वर्णनाच्या स्थावर मालमत्तेचा ताबा बँकेतर्फे अधिकृत अधिकारी ह्यांनी दिनांक 26/12/2022 रोजी घेतलेला आहे.

दी सिक्युरीटायझेशन अँण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनांशियल अॅसेटस् अँण्ड एन्फोर्समेन्ट ऑफ सिक्युरीटी इन्ट्रेस्ट अॅक्ट 2002 चे कलम 13(12) व सिक्युरीटी इन्टरेस्ट (एन्फोर्समेन्ट) रुल्स् 2002 चे कलम 8, 9 अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारावरून खालील सही करणार अधिकृत अधिकारी खालील वर्णनाचे गहाण स्थावर मालमत्तेची निविदेव्दारे विक्री करण्याकरीता जाहीरात देण्यात येत आहे.

Security Interest (Enforcement) Rules 2002 च्या नियम 8 (6) अन्वये थकीत कर्जदार, श्री. विनोदकुमार कन्हैय्यालाल राठी (कर्जदार) यांना दिनांक 31/12/2023 रोजीच्या जाहिरातीव्दारे अंतीम संधी देण्यात आली होती.

बँकेने खालील गहाण स्थावर मालमत्ता ज्या ठिकाणी आहे आणि ज्या परिस्थितीत आहे तशीच विक्री करण्याकरीता सिलबंद निविदा मागविण्याचे ठरविले आहे. कर्ज रकम रुपये 58,54,638/- अधिक पुढील व्याज व ईतर वसूलपात्र शुल्क येणे बाकी असलेल्या रकमेच्या वसुलीकरीता निविदा मागविण्यात येत आहे. ज्या कुणास खालील वर्णन केलेली स्थावर मालमत्ता विकत घ्यावयाची असेल त्यांनी आपली निविदा, अधिकृत अधिकारी, डॉ. पंजाबराव देशमुख अर्बन को-ऑप बँक लि., वसुली विभाग, मुख्य कार्यालय, इर्विन चौक, अमरावती या पत्त्यावर सिलबंद पाकीटामध्ये ज्यावर कर्जदाराचे नावासह स्थावर मालमत्तेबाबत निविदा असे स्पष्टपणे नमुद करावे. सोबत अनामत रक्कम रु. 1,00,000/- चा ड्राफ्ट / पेऑर्डर प्रति निविदेसाठी जो डॉ. पंजाबराव देशमुख अर्बन को-ऑप बँक लि., अमरावती च्या नावाने असलेला दिनांक 25/11/2026 पर्यंत कार्यालयीन वेळेत सादर करावी.

<u>सिलबंद निविदा सोमवार, दिनांक 30/11/2026 रोजी दुपारी 12:00 वाजता, डॉ. पंजाबराव देशमुख अर्बन को-ऑप बँक लि., अमरावती, वसुली विभाग, अमरावती येथे उघडण्यात येतील.</u> ज्या खरेदीदाराची निविदा जास्त रकमेची असेल त्यास खरेदी किमतीच्या 25% रकम त्याच दिवशी बँकेत जमा करावी लागेल. जर त्याने तसे केले नाही. तर अनामत रक्कम जप्त करण्यात येईल. बाकी राहीलेली उर्वरीत 75% रकम विक्री कायम करण्याच्या तारखेपासून 15 दिवसांचे आत बँकेत जमा करावी लागेल. वेळेवर रकम देण्यास कसूर केल्यास स्थावर मालमत्ता पुन्हा विक्रीस काढण्यात येईल व अनामत म्हणून दिलेली रकम परत मिळणार नाही आणि ती जप्त करण्यात येईल व पुन्हा विक्रीमध्ये किंमत न आल्यास फरकाची रकम कसूरदाराकडून वसुल करण्यात येईल. विक्री कायम केल्यानंतर व पूर्ण रकमेचा भरणा केल्यानंतर बँकेतर्फे अधिकृत अधिकारी, परिशिष्ट 5 मध्ये दिलेल्या नमून्यात सेल सर्टिफिकेट खरेदीदाराचे नावाने करून देतील परंतू वरील अट पूर्ण झाल्यानंतरच सेल सर्टिफिकेट देण्यात येईल.

गहाण स्थावर मालमत्तेचा तपशील

सर्व्हे नं. 62/2-ए, अंतर्गत असलेले एकूण 8 - प्लॉट्स, प्लॉट नं. 21,22,44,48,63,65, 73 / ए व 84, गजानन नगरी गोल्ड स्पॉट, एकूण क्षेत्रफळ 14157 चौ. फूट, श्री. चैतन्य विनोदकुमार राठी यांचे नावे असलेला, मौजा येरला, ता. मोर्शी, जि. अमरावती.

वरील गहाणातील मालमत्तेची एकूण राखीव किंमत रु. 56,59,000/- आहे.

निविदेव्दारे विक्री करावयाच्या स्थावर मालमत्तेच्या हक्काविषयी किंवा त्रयस्थ यांनी दावा सांगीतल्यास कोणत्याही अधिकाऱ्यास इतर बोझ्याबाबत किंवा विधीग्राह्यतेविषयी बँकेला कोणतीही माहीती नसून त्याबाबत कोणतीही हमी देण्यात येत नसून त्याबाबत बँक जबाबदार राहणार नाही.

अटी व शर्ती-

1. निविदा सादर करावयाचा छापील अर्ज बँकेचे वसुली विभाग, मुख्य कार्यालय, इर्विन चौक, अमरावती तसेच बँकेची शाखा : वि. म. वि. रोड येथून कार्यालयीन वेळेत प्राप्त करता येतील.
2. राखीव किंमती पेक्षा कमी किमतीची निविदा स्विकारल्या जाणार नाही.
3. निविदेच्या कोणत्याही प्रक्रीयेबाबत अंतिम निर्णय, एक किंवा सर्व निविदा स्विकारणे अथवा नाकारणे तसेच लिलाव रद्द करण्याचा अधिकार अधिकृत अधिकारी यांनी राखून ठेवलेला आहे.
4. लिलावाचे दिनांकापासून 15 दिवसांचे आत कर्जदाराने कर्जरकमेचा भरणा केल्यास लिलाव प्रक्रीया आपोआप रद्द होईल. तसे झाल्यास निविदाधारकाने भरणा केलेली रकम त्यांना परत केली जाईल. त्याकरीता कोणतेही जादाचे व्याज बँकेस देय राहणार नाही.
5. निविदा धारकाने निविदेसोबत पॅन कार्ड व आधार कार्ड ची छायांकीत प्रत ओळखपत्र व रहिवासी पुरावा म्हणून जोडणे आवश्यक आहे.
6. नियमाप्रमाणे लागू असलेली स्टॅम्प ड्युटी, नोंदणी फी इत्यादी प्रकारचा खर्च निविदाधारकास करावा लागेल.
7. स्थावर मालमत्तेच्या विक्रीनंतर लागणारा विक्रीकर, वाहतूक खर्च व आवश्यकतेनुसार अन्य खर्च निविदाधारकास करावा लागेल.
8. स्थावर मालमत्तेवर असलेले सरकारी, निमसरकारी, खाजगी स्वरुपाचे इतर कसलेही देणे अथवा बोझे असल्यास ती देण्याची जबाबदारी निविदाधारकाची राहील.
9. विद्युतबिल व इतर प्रकारचे सरकारी कर देण्याची जबाबदारी निविदाधारकांची राहील.
10. स्थावर मालमत्ता ज्या ठिकाणी आहे आणि ज्या परिस्थितीत आहे तशीच विक्री करीता उपलब्ध आहे.
11. लिलावातील संपत्तीचे निरिक्षण दिनांक 30/10/2026 रोजी कार्यालयीन वेळेत करता येईल.
12. विक्रीच्या आणखी अटी व शर्ती असल्यास त्या निविदा उघडण्याच्या वेळेस सांगण्यात येतील.

विजय जी. इंगळे
अधिकृत अधिकारी
डॉ.पंजाबराव देशमुख अर्बन को-ऑप बँक लि., अमरावती

ठिकाण : अमरावती
दिनांक : 23/10/2026

Scanned with OKEN Scanner